# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

१३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई-४०० ००५
दूरध्वनी : ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फॅक्स: ०२२-२२१६ ३९७६
ई-मेल: mercindia@merc.gov.in/mercindia@merc.gov.in
वेब-साईटः www.mercindia.org.in / www.merc.gov.in

## अधिसूचना

**विद्युत अधिनियम, २००३**

**क्र. मविनिआ/लिगल/२०१७/०१२८९ :** विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६१, ६६, ८६(१)(इ) सह कलम १८१ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या आणि या संदर्भात त्यास समर्थ करणा-या अन्य सर्व अधिकारांचा वापर करुन व पूर्व-प्रसिध्दी नंतर, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग याद्वारे “महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती) विनियम, २०१५” मध्ये सुधारणा करण्यासाठी खालील विनियम करीत आहे :-

**१. संक्षिप्त शीर्षक, व्याप्ती व प्रारंभ**

१) या विनियमांना, “महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती) (पहिली सुधारणा) विनियम, २०१७”, असे म्हणावे.

२) हे विनियम शासकीय राजपत्रातील त्यांच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून अंमलात येतील.

**२. विनियम ४६.२ च्या परंतुकामध्ये सुधारणा**

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती) विनियम, २०१५ च्या विनियम ४६.२ चे परंतुक खालीलप्रमाणे आहे :

*“परंतु असे की, असा कसूर केलेला बायोमासवर आधारित विद्युत प्रकल्प, कसूराच्या कालावधीत, संबंधित वर्षाकरिता अशा परवानाधारकाच्या सरासरी वीज खरेदी दराने, वितरण परवानाधारकाला विजेची विक्री करणे चालू ठेवील.”*

सदर परंतुक खालीलप्रमाणे बदलण्यात येईल :

*“परंतु असे की, असा कसूर करणारा बायोमासवर आधारित विद्युत प्रकल्प, कसूराच्या कालावधीत, संबंधित वर्षाकरिता निश्चित केलेल्या व लागू असलेल्या अधिमान्य वीज दरापेक्षा प्रति युनिट रु.०.५० या कमी वीज दराने, वितरण परवानाधारकाला विजेची विक्री करणे चालू ठेवील.”*

**अश्वनी कुमार सिन्हा**
**सचिव,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**

**मुंबई**
**दिनांकः ४ जानेवारी, २०१७**

---

सूचनाः “महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती) विनियम, २०१५”, शासकीय राजपत्रात दिनांक १० नोव्हेंबर, २०१५ रोजी अधिसूचित करण्यात आले होते.